| | |
|---|---|
| **MHPU**120004122024 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.९०/२०२४ मधील नि.क्र.१६ वरील आदेश</u>**<br>श्री. अभिषेक नंदकुमार भिडे<br>**विरुध्द**<br>श्री. सदाशिव उर्फ मिलींद रामेश्वर भिडे. |

प्रतिवादी क्र.०१ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा विना कैफियत आदेश रद्दबातल करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन, वाटणीकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये दि.०४/१२/२०२४ रोजी विना कैफियत असा आदेश प्रतिवादीविरुध्द झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी हे पॅरालिसीसने आजारी असल्यामुळे त्यांना विहित मुदतीत त्यांना कैफियत दाखल करणे शक्य झालेले नाही. सबब, त्यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. वादी यांनी नि.२३ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे अर्जामध्ये विलंबाबत कोणतीही कारणे नमूद केलेली नाहीत. तसेच दाव्याचे काम लांबविण्याकरीता प्रस्तुत कैफियत जाणीवपूर्वक उशिरा दिलेली आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाईकरीता व वाटणीकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१.　प्रतिवादी क्र.१ विरुध्द पारीत करण्यात आलेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येत आहे.

२.　प्रतिवादी क्र.१ ची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.07.03 17:34:30 +0530

**ठिकाण – भोर**　　**( एस.डी.शिरसाट )**

**दिनांक – ०३.०७.२०२५.**　　**०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .**